## पुणे विद्यापीठ

दूरध्वनी : २५६०१२६१
तारेचा पत्ता :'युनिपुना'
फॅक्स : ०२०.२५६९३८९९

गणेशखिंड,
पुणे ४११००७

संदर्भ क्र. शै.प्रवेश/3090 दिनांक : 21/7/2011

प्रति,
मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे—४११ ००७.

**विषय— स्कॉलरशिप/फ्रिशीपबाबत...**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष सन २०११—२०१२ करिता आपल्या विभागात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय तसेच खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती/फ्रीशीप सवलती उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

१. एस.सी. शिष्यवृत्ती/फ्रिशीप
२. एन.टी. शिष्यवृत्ती/फ्रिशीप
३. एस.बी.सी. शिष्यवृत्ती/फ्रिशीप
४. ओ.बी.सी. शिष्यवृत्ती/फ्रिशीप
५. एस.टी. शिष्यवृत्ती/फ्रिशीप
६. अहिंदी शिष्यवृत्ती
७. एकलव्य आर्थिक योजना
८. राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती
९. अपंग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती
१०. *ई.बी.सी सवलत योजना }
११. *पी.टी.सी. सवलत योजना (प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी सवलत) } *प्रकाशन विभागात आवेदनपत्रे उपलब्ध होतील.
१२. *एस.टी.सी. सवलत योजना (माध्यमिक शिक्षकांच्या पाल्यांना मिळणारी सवलत) }
१३. संरक्षण खात्यातील सेवकांचे पाल्यांकरिता सवलत योजना
१४. माजी सैनिकांच्या पाल्यांकरिता सवलत योजना
१५. अल्पसंख्यांक गुणवत्ता शिष्यवृत्ती

वरील आवेदनपत्राच्या कोऱ्या प्रती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. सदर आवेदनपत्रे आपल्या स्तरावर विद्यार्थ्यांकडून भरून घेवून दिनांक **३१ ऑगस्ट, २०११** अखेर या कार्यालयाकडे नोंद करून पाठवावीत.

अल्पसंख्यांक गुणवत्ता शिष्यवृत्ती आवेदन पत्र **दि. ३१ ऑगस्ट, २०११** पर्यंत पाठवावी. अपूर्ण व चुकीची माहिती असलेले आवेदनपत्रे तसेच मुदतीनंतर प्राप्त झालेली आवेदनपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

शिष्यवृत्ती/फ्रिशीप आवेदनपत्रे भरून घेण्यासाठी मार्गदर्शक सूचना सोबत पाठवित आहोत. तसेच शिष्यवृत्ती व फ्रीशीप आवेदनपत्रे भरणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती भरावयाचा तक्ता सोबत जोडला आहे. प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती/फ्रिशीप याप्रमाणे वेगवेगळी भरून Excel Format मध्ये करून सीडी व हार्ड कॉपीसह पाठवावी. कोणत्याही विद्यार्थ्याला आवेदनपत्रे घेण्यासाठी, भरून परत देण्यासाठी या कार्यालयात पाठवू नये.

विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बॅकेत बॅकखाते उघडणे बंधनकारक आहे. विद्यर्थ्यांनी त्यांचा खातेक्रमांक, बॅकेचा संपूर्ण पत्ता, बॅक आय.एफ.एस. कोड (११ आकडी), बॅकेचा एम.आय.सी.आर. कोड इ. माहिती अर्जात बिनचूकपणे नमूद करावा. अन्यथा सदर अर्जाचा विचार करता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी, ही विनंती.

शिष्यवृत्ती/फ्रीशीप/सवलती याबाबतची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
(शैक्षणिक प्रवेश)

**सोबत:—** मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग व विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती/फ्रीशीपबाबत मार्गदर्शक सूचना.

**प्रत माहितीसाठी:—**

१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
२. मा. कुलसचिव यांचे स्वीय सहायक

## शिष्यवृत्ती/फ्रीशपी आवेदनपत्र भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना
## (Statement)

१. शिष्यवृत्ती व फ्रिशिप या प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती वेगवेगळया तक्त्यांमध्ये त्यांच्या प्रवर्गाप्रमाणे पाठविणे आवश्यक आहे.
२. शिष्यवृत्तीचा अर्ज भरताना एस.सी. व एस.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृह असेल तर भत्ता रू. ५,१००/— व वसतिगृह नसेल तर भत्ता रू. ३,३००/— याप्रमाणे तसेच ओ.बी.सी. व एन.टी. व एस.बी.सी. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना रू. २,९००/— व रू. १,९००/— याप्रमाणे तक्त्यांमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.
३. फ्रीशीप अर्ज भरताना कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृह भत्ता देय नसल्यामुळे सदर रकाना भरण्यात येंऊ नये.
४. शिष्यवृत्ती व फ्रीशपी यांच्या तक्त्यांमध्ये वसतिगृह शुल्क, शैक्षणिक शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क तसेच विद्यार्थ्याचा बॅक खाते कमांक, बॅक शाख कोड, बॅकेचा एम.आय.सी.आर. कोड बिनचूकपणे भरणे आवश्यक आहे.
५. सदर तक्त्यांमधील माहिती विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, पुणे व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प, घोडेगाव यांना पाठविण्यात येणार आहे.
६. शिष्यवृत्ती व फ्रिशीपच्या तक्त्यावर मा. विभागप्रमुखांची स्वाक्षरी घेऊन शैक्षणिक प्रवेश विभागाकडे पाठवावी.
७. व्दितीय वर्षाच्या प्रवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/फ्रीशीप करीता आवेदनपत्र सादर करणे गरजेचे आहे.
८. SC, DTNT, OBC, SBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशीप अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा खुल्या गटातील विद्यार्थ्याप्रमाणे त्याना फी भरावी लागेल याची कल्पना विद्यार्थ्यांना देण्यात यावी. विभागांनीही शिष्यवृत्ती/फ्रिशीपसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी सूचना फलकावर त्वरीत लावावी.
९. विद्यार्थ्यांनी अर्जावर बॅक खाते कमांक, एम.आय.सी.आर. कोड, आय.एफ.एस. कोड (११ आकडी) देणे आवश्यक आहे.

## शिष्यवृत्ती/फ्रिशीप आवेदनपत्र भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना

आवेदनपत्र सुवाच्च्य अक्षरात संपूर्ण भरावे. कोणताही रकाना रिकामा ठेवू नये. आवेदनपत्रासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

१. महाविद्यालयाचा स्थानांतर दाखला (मूळ प्रत)
२. जातीचा दाखला व मागील वर्षाचा उत्पन्नाचा दाखला
३. मागील वर्षी मिळालेल्या शिष्यवृत्ती/फ्रीशीपबाबतचे आदेशपत्र
४. एस.सी./एस.टी./एन.टी./ओ.बी.सी. आणि एस.बी.सी. या प्रवर्गातील उमेद्‌वारांचे जात पडताळणी प्रमाणपत्र.
५. प्रथम/व्दितीय/तृतीय वर्षाच्या गुणपत्रिका (झेरॉक्स प्रती)
६. विद्यापीठाची फी भरल्याची पावती तसेच वसतिगृह असल्यास त्याचा दाखला
७. विद्यार्थी दुसऱ्या जिल्हयातील असल्यास जिल्हा बदली प्रमाणपत्र
८. वडील हयात नसल्यास वडिलांचा मृत्यू दाखला
९. शिक्षणात खंड पडलेला असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे गॅप सर्टिफिकेट व शपथपत्र
१०. शिष्यवृत्ती अर्जावर स्वत:चा पासपोर्ट फोटो लावावा व त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का असावा.
११. विद्यार्थिनीचे लग्न झाले असल्यास पतीचा उत्पन्नाचा दाखला
१२. तहशीलदार यांचा उत्पन्नाचा दाखला आवश्यक

## अहिंदी स्कॉलरशिप आवेदन पत्राबाबत

१. आवेदनपत्रावर स्वत:चा फोटो लावावा. त्यावर विभागप्रमुखांची स्वक्षरी व शिक्का घ्यावा.
२. मागील वर्षाची गुणपत्रिका (साक्षांकित)
३. उत्पन्नाचा दाखला
४. विद्यापीठात फी भरल्याची पावती.
५. विद्यार्थी हिंदी विषयाचा पूर्णवेळ अध्ययन करणारा असावा.
६. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. मातृभाषा हिंदी नसावी.

## एकलव्य आर्थिक सहाय्य योजना

१. पदवी परीक्षेस विज्ञान शाखेकरिता किमान ७० टक्के गुण तर कला, वाणिज्य विधी शाखेकरिता किमान ६० टक्के गुण असावेत (गुणांची टक्केवारी कमी/जास्त होण्याची शक्यता असते.)
२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. ७५,०००/— पेक्षा कमी असावे.
३. नूतनीकरणाकरिता किमान ७५ टक्के उपस्थिती व पहिल्या वर्षी सर्व विषयात उत्तीर्ण होऊन किमान ५० टक्के गुण आवश्यक आहेत.

## अपंग विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती

१. आवेदन पत्रावर स्वत:चा फोटो लावावा व त्यावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी घ्यावी.
२. त्रिस्तरीय डॉक्टरांनी स्वाक्षरी व सही असलेले ससून हॉस्पिटल, पुणे यांचा अपंगत्वाचा दाखला.
३. मागील वर्षाची गुणपत्रिका
४. विद्यापीठात प्रवेश घेतल्याबाबत दाखला.

## ई.बी.सी. अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत

१. फॉर्मवर सरपंच यांची स्वाक्षरी घ्यावी.
२. उत्पन्न मर्यादा रू १५,०००/— इतकी राहील.
३. अर्जावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी/शिक्का आवश्यक आहे.
४. विद्यापीठात फी भरल्याची पावती
५. मागील वर्षाची गुणपत्रिका

## एस.टी.सी/पी.टी.सी. आवेदनपत्राबाबत माहिती

१. अर्जावर शाळेच्या मुख्याध्यापकांची स्वाक्षरी व शिक्का आवश्यक आहे.
२. गटशिक्षणाधिकारी यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.
३. शाळेचा मान्यतेचा क्रमांक लिहावा
४. विद्यापीठाची फी भरल्याची पावती.
५. अर्जावर विभागप्रमुखांची स्वाक्षरी/शिक्का असावा.
६. मागील वर्षाची गुणपत्रिका

## माजी सैनिक/संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतीबाबत

१. मागील वर्षाची गुणपत्रिका
२. प्रवेश घेतल्याबाबतचे प्रवेशपत्र (फी पावती)
३. जिल्हा सैनिक कल्याण बोर्ड यांचे सेवेत असल्याबाबतचे पत्र जोडावे.
४. माजी सैनिकांच्या पालकांचा डिस्चार्ज दाखला जोडावा.

## राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

१. अर्जावर विद्यार्थ्यांचा फोटो असावा. त्यावर विभागप्रमुखांची सही व शिक्का असावा.
२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रू. १,००,०००/— पेक्षा कमी असावे.
३. मागील तीन वर्षाच्या गुणपत्रिका तसेच फी भरल्याची पावती जोडावी.

## महत्वाच्या सूचना :—

१. एस.सी./एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी./एन.टी. या प्रवर्गीय विद्यार्थ्यांची प्रथम वर्षी शिष्यवृत्ती मंजूर झाली असल्यास सलग व्दितीय वर्षाकरिता शिष्यवृत्ती आवेदनपत्र भरण्याची आवश्यकता आहे.

२. ई.बी.सी./पी.टी.सी./एस.टी.सी./सर्व्हिसमन/एक्स.सर्व्हिसमन/एकलव्य/ अहिंदी /अपंग/राष्ट्रीय गुणवत्ता या शिष्यवृत्ती सवलती घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिक्षण शुल्क/परीक्षा शुल्क/इतर शुल्क पूर्ण भरणे जरूरीचे आहे.

३. एस.सी/एन.टी./एस.बी.सी./ओ.बी.सी. स्कॉलरशिपकरिता पालकांचे मागील वर्षाचे उत्पन्न रू १,००,०००/— पेक्षा कमी असावे. तसेच फ्रिशीपकरिता उत्पन्न मर्यादा रू. १,००,०००/— जास्त पुढे राहील.

४. एस.टी. स्कॉलरशिपकरिता उत्पन्न मर्यादा रू. १,०८,०००/— पेक्षा कमी असावी. तसेच एस.टी. फ्रिशिपकरिता उत्पन्न मर्यादा रू. १,०८,०००/— पेक्षा जास्त राहील.

५. व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून अव्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतल्यास शिष्यवृत्ती मिळत नाही.

६. शैक्षणिक गॅप असल्यास व्दितीय वर्षाचे स्कॉलरशिप/फ्रिशीप आवेदनपत्र भरणे आवश्यक आहे.

७. आवेदनपत्राबरोबरच वसतिगृह असल्यास वसतिगृह प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती ७५ टक्के असणे आवश्यक आहे. हे विभागप्रमुखांनी प्रमाणित करावे.

९. नूतनीकरण करताना मागील वर्षी ज्या अभ्यासक्रमास विद्यार्थी शिकत होता ती परीक्षा त्याने उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे.

१०. शिष्यवृत्ती/फ्रिशीप आवेदनपत्रासोबत जोडलेली सर्व कागदपत्रे विभागप्रमुखांनी साक्षांकित केलेली असावीत.

११. व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती/फ्रिशीप आवेदनपत्र सादर केल्यास जात पडताळणी दाखला जोडणे आवश्यक आहे.

१२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक व परीक्षा शुल्क घेवू नये.

१३. एका विद्यार्थ्यास एकच शिष्यवृत्ती किंवा फ्रिशीप किंवा सवलत मिळेल.

१४. विद्यार्थ्यांनी त्यांच्या नजिकच्या राष्ट्रीयकृत बॅकेत बॅकखाते उघडणे बंधनकारक आहे.

१५. विद्यर्थ्यांनी त्यांचा खातेक्रमांक, बॅकेचा संपूर्ण पत्ता, बॅक आय.एफ.एस. कोड (११ आकडी), बॅकेचा एम.आय.सी.आर. कोड इ. माहिती अर्जात बिनचूकपणे नमूद करावी. अन्यथा सदर अर्जाचा विचार करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Scholarship

| | Contact, Name of College, Address | MICR Code | IFS Code | Account No | District | Current Month | Current Year | Financial Year | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| Sr No | Name of Student | MICR Code | IFS Code | Account No | Gender | Caste Category | Current Course | Course Year | Hosteller or Day Scholar | Date of College Admission | Date of Joining Hostel | Parent's Annual Income | Maint. Allowance | Tuition Fees | Exam Fees | Other Compulsary Fees | Total Sactioned Amount |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

Freeship

| | Contact, Name of College, Address | MICR Code | IFS Code | Account No | District | Current Month | Current Year | Financial Year | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

| Sr No | Name of Student | Gender | Caste Category | Current Course | Course Year | Date of College Admission | Parent's Annual Income | Tuition Fees | Exam Fees | Other Compulsary Fees | Total Sactioned Amount |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |